म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २२७०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
प्रकाशन ९२
दिनांक ८-४-७५

# शाहीर वनजातकृत पोवाडे व नाटयछटा

२०७१४ काव्य
२२७० वन

प्रकाशक व लेखक - ह. श्री. देशपांडे. B. A. LL. B. अॅडव्होकेट,
इंदापूर, जिल्हा पुणें.

मुद्रक ... मान छापखाना ७१८ सदाशिव,

REFBK-0020714
REFBK-0020714

...७५

किंमत ३ रुपये

२०५९४ श्री २२५० ५५५५ नाव्य
२०५९४ ५५७५५ नाव्य २२५०

शाहीर वनजात विरचित

# देवतारी त्याला कोण मारी !!

## पोवाडा

आधि नमन शारदा चरणा । शारदा चरणा । शारदा चरणा ।
शारदा चरणा ॥
वनजात शाहिर कवनाला । शाहिर कवनाला । शाहिर कवनाला ।
देवानो ! या गाण्याला ॥
कुलदैवत आधि नमुनि ।
श्रीदत्ता नमन करूनि ।
अम्बेच्या चरणी पाणी ।
हा संतांचा पोवाडा । भक्तिचा तोडा । पापाचा मोडा ।
सज्जन हो । या ऐकण्या ॥
आशीर्वच द्या ऐकण्या । श्रोतृ वृंदण्या । संत गुण गाण्या ।
पोवाडा दैवी गाण्या ॥ १ ॥
नामयाचा धरुनि हात । त्वरित स्वप्नांत । थाप पाठीत ।
जगजेठी आज्ञा देत ॥

## निवेदन

मागील ग्रंथाची विक्री रक्कम बऱ्याच प्रमाणांत वसूल होवू शकली नाहीं. म्हणून २।३ वर्षे वनजात प्रकाशनकार्य बंद पडलें. क्षमस्व. आतां पुनः आर्थिक अडचण सोसून प्रकाशन कार्य सुरु केलें आहे. कळावें.

आपला

१५।२।७५ वनजात प्रकाशन

## शुद्धि पत्र

| पान | ओळ | दुरुस्ती |
|---|---|---|
| १ | १४ | वृंदण्या |
| ४ | १४ | मृषा |
| १० | १३ | फडकवीन |
| १४ | ११ | ऐकण्या |
| २७ | १३ | ऐकण्या |

पान १, ८, १०, २७ यांत 'ऐकाण्या' वाचावा.

२०५९४ श्री २२५० नाट्य ५५५५
२०५९४ ५५७५५ नाट्य २२५०

शाहीर वनजात विरचित

# देवतारी त्याला कोण मारी !!

## पोवाडा

आधि नमन शारदा चरणा । शारदा चरणा । शारदा चरणा ।
शारदा चरणा ॥
वनजात शाहिर कवनाला । शाहिर कवनाला । शाहिर कवनाला ।
देवानो ! या गाण्याला ॥
कुलदैवत आधि नमुनि ।
श्रीदत्ता नमन करूनि ।
अम्बेच्या चरणी पाणी ।
हा संतांचा पोवाडा । भक्तिचा तोडा । पापाचा मोडा ।
सज्जन हो । या ऐकण्या ॥
आशीर्वच द्या ऐकण्या । श्रोतृ वृंदण्या । संत गुण गाण्या ।
पोवाडा दैवी गाण्या ॥ १ ॥
नामयाचा धरुनि हात । त्वरित स्वप्नांत । थाप पाठीत ।
जगजेठी आज्ञा देत ॥

देखोनि दृश्य अद्‌भूत । चमत्कृति मात । रुक्मिणी कांत ।
कीर्तनी कवित्वा थाट ॥
तुकयाची ऐकुनि कीर्त । सिंहगड धूर्त । शिवाजी तूर्त ।
पातला पुण्य नगरीत ॥
संतोष शिवाला झाला ॥
बनिया गृहि कीर्तन काला ।
वृत्तांत राजया कळला ।
यवनाची भीती बहुत । लपुनि नृपनाथ । पातले त्वरित ।
तुकयाच्या दर्शनि चित्त ॥ २ ॥
मोहरा भरुनि तबकांत । होनही त्यांत । मान तुकवीत ।
तुकयाला स्वामी देत ॥
थरथरा द्रव्य दृष्टींत । कशा मोहांत । प्रपंची कात ।
विठ्ठली चित्त एकांत ॥
लाजला मनी नृपनाथ । तुका बोलत । स्मरण नामांत ।
विठ्ठली आवडी नाथ ॥
शिवराज जाहले चाट ।
चित्तांत प्रेम गोल्हाट ।
तुळसीची माळा घाट ।
हरिदिनी पाहूनी थाट । कीर्तनी मात । ऐकण्या नाथ ।

कीर्तनांत रमला बहुत ॥ ३ ॥
शिवराज पुत्र जिजाइचा । भक्त देविचा । दुष्मनी काचा ।
जीवनी हिंदु धर्मांचा ॥
ऐकण्या संत तुकयाचा । प्रसाद देवाचा । पुण्य वचनाचा ।
कीर्तनांत रमला साचा ॥
कीर्तनांत भरला रंग । होऊनि दंग । जाहला गुंग ।
श्रोत्यांचा सागर सा[illegible] ॥
चाकणास वार्ता कळली ।
यवनाची बाही स्फुरली ।
सुभेदारी सेना आली ।
जी भूमि पूर्व पुण्याइ । पुण्य नगराइ । असें नवलाइ ।
कीर्तनासी दे घेराई ॥ ४ ॥
शिवराजा आली जाण । बंधनी खूण । दृश्य दारूण ।
तुकयासी कळे वृत्तांत ॥
सज्ञानी सत्वरगती । पळविणें नृपति । प्राण वांचती ।
कीर्तनी विन्मुखी नष्ट ॥
उपदेश ऐकुनि खास । धरूनि विश्वास । निश्चये बैस ।
जगजेठी तारक खास ॥
समुदाय वैष्णवी संत ।

REFBK-0020714
REFBK-0020714

दिन एकादशिचा त्यांत ।
किति भाग्य ! धन्य !! मरणांत !!! ।
कीर्तनांत फिरले हेर । परदळी वीर । धरू विचार ।
राजास नोळखी यवन ।। ५ ।।
तुकयांची कीर्तन शान । अभंग गान । करी बेभान ।
वाचस्पति संगीतात ॥
समशेर फिरूं द्या त्वरित । मारणें संत । धरूं ना खंत ।
शिवबास घडे देहान्त ॥
अंतरी साक्ष तुकयास । कळे वृत्तांत । हांक दे त्वरित ।
धांवरे ! पंढरीनाथ ॥
गजर हा तुझ्या नामाचा ।
संकटे पळविती वाचा ।
मज धाक नसे मरणाचा ।
जरि घडे नृपा हे वचन । संत सज्जन । राहि ना मान ।
मरण हे खास आम्हास ॥ ६ ॥
जगजेठि हांक ऐकती । त्वरित धांवती । अभय त्या देती ।
कीर्तनी भरू द्या रंग ॥
जाहला शिवाजी देव । सत्वरी धाव । आरूढी अश्व ।
पळण्यांत जाहला दंग ॥

कीर्तनांत उठवी हूल । स्वयें गोपाल । ' पळे ' हा बोल ?
चालली वीज हा ढंग ॥
क्षण एक दृष्ट यवनास ।
चपळत्व दाविले खास ।
दल निघे त्यास धरण्यास ।
कीर्तनी तुका अभंग । शांत ना भंग । संत–जन भृंग ।
कीर्तनासि भरला रंग ॥ ७ ॥
लागले सैन्य पाठीस । कहर नगरास । जाग जनतेस ।
देखती शिवाजी खास ॥
पकडतील सैनिक त्यास । प्राण कंठास । घोर जनतेस ।
वांचवी कोणता त्यास ? ॥
धांवतो शिवाजी वीर । देखूनि हेर । धरुनि द्या मार ।
दावितो चुणुक सर्वास ॥
जवळ जो दिसे शिवराय ।
धरु जाता काहीं नाय ।
चालली अशी ही माय ।
महावीर सर्व झुलविले । अरण्या नेले । कंटकी भ्याले ।
जगजेठि दिसेना त्यास ॥ ८ ॥
मग मावळला निशापति । हेर धांवती । नृपा शोधीती ।

कंटकी त्रस्त होताती ॥
सैन्यास अश्व सोडती । वस्त्र फाटती । दशा घडवीती ।
नृपनाथ दिसेना अंतीं ॥
रक्ताचि धार उसळती । दिशा ना कळती । ठेंचाळी पडती ।
घोरांत यवन पडताती ॥
हातांतील शस्त्रें गळतीं ।
नागडे, नागवण पळती ।
देखोनि दशा ते रडती ।
यवनाचि शान उतरली । निशा काळेलि । दिसेना चाली ।
पांगले वीर एकान्ती ॥ ९ ॥
कीर्तनी हरी परतती । रुक्मिणीपती । गजर ऐकती ।
घेतली भेट तुकयाची ॥
दुर्जनासि करूनी दंड । पंढरीनाथ । मोडलें बंड ।
तुकयाचे कानीं मंद ॥
कीर्तनांत व्हावे दंग । वदे श्रीरंग । निर्भयी चंग ।
नाचती देव आनंद ॥
नामाचा झाला गजर ।
टाळीही जयजयकार ।
वनमाळी तुष्ट फार ।

राजास सांगतो स्पष्ट । दारुणाऽरिष्ट । जाहलें नष्ट ।
रुक्मिणीकांत मदतीस ॥ १० ॥
उदयासि अरुण पातला । आरती बोला जागरण झोला ।
जगजेठी ओवाळीला ॥
जाहला गजर नामाचा । नमन जनतेचा । अश्व शिवबाचा ।
नगरांतुनि घोडा गेला ॥
आश्चर्य नगरलोकांत । रात्रिला पळत । बोल लोकांत ।
तुज ऐसा गेला लाल ॥
यवनही पळाले पाठीं ।
अघटीत कार्य शतकोटी ।
वांचला चमत्कृति पोटीं ।
ईश्वरें रूप घेऊनी । करणी करवुनि । कृपा करवोनी ।
दाविला पैलतिर त्यांनीं ॥ ११ ॥

॥ हर, हर, महादेव ॥

## पानिपत आघाडी

आधि नमन शारदा चरणा। शारदा चरणा। शारदा चरणा।
शारदा चरणा ॥
वनजात शाहिर कवनाला। शाहिर कवनाला। शाहिर कवनाला।
देवांनीं या गाण्याला ॥
चिंतामणि उज्जैनिचा।
वंद्य महाकालेश्वरचा।
कुलपती तसा शिंद्यांचा।
आशीर्वच त्या दत्ताचा। अम्बा मातेचा। हिंदु धर्माचा।
मल्हार मराठशाहीचा ॥
हा मर्दाचा पोवाडा। निधड्या छातीचा। वैभवी साचा।
मानव हो ! या ऐकण्या ॥ १ ॥
धन्य ! धन्य ! शिंदे दत्ताजी। सुभेदार राजी। तसा रणगाजी।
वैभवी मराठेशाही ॥
रोहिला नजीबखान। गळा कापून। कपट करवून।
फितुरीत डवचला शाही ॥
दत्ताजी रणांगणीं पडला। रणीं फेकला। जायबंद झाला।
जनकोजी तसा शिंदेही ॥

लखांचे पोशिंदे जे ।
गनिमांचे गोळ्यांनीं जे ।
भूमीस रक्त वंदी जे ।
राजाराम इमानी वीर । दिलाचा थोर । रक्ष तत्पर ।
शेणवई राघोबा शूर ॥ २ ॥
ऐकून खबर शिंद्यांची । गजारूढांची । कुतुबशाहाची ।
जो गुरू नजीबखानाचा ॥
समशेर चालवी नीच । पशूहुनि नीच । कृती कां हीच ॥
सासरा नजीबखानाचा ॥
खोचूनि शीर भाल्यास । लाथ प्रेतास । गजावर बैस ।
चित्तांत हर्ष गर्वाचा ॥
संताप राजारामाला ।
वार जरि याला केला ।
संस्कार प्रेत मावळला ।
विनवितो हात जोडोनि । क्षमा करवोनी । शीर द्या मानी ।
संस्कार करूं प्रेताचा ॥ ३ ॥
राजाराम् इमानी वीर । चालला धीर । परत द्या शीर ।
छावणींत शिरला खास ॥
शीर हा सोन्याचा कळस । चढवूं मशिदीस । परत ना यास ।
खंडणी नको आम्हास ।

चरफडे करी वीचार । उडवितो शीर । सूड समशेर ।
काळ ना अजूनि यास ॥
मध्यस्त सुजाउदौला ।
अनुपगीर गोसाव्याला ।
चतुराइ मात वकिलाला ।
जामीन दोन लाखास । मिळविलें शीर । घेऊनि वीर ।
परतला राजाराम शूर ॥
दख्खनास वार्ता कळलि । मनें थरथरलि । नीच कृत्याली ।
सूड ! सूड ! ग्वाही फिरली ॥
विश्वास सदाशिवराव । थोर उमराव । जाट उमराव ।
दिल्लीवर स्वारी झाली ॥
फडकवीच भगवा झेंडा । मोगली बंडा । करवुनी दंडा ।
माळ तैं शिरांची घाली ॥
श्रीफली शिरासी मानी ।
राजाराम बोले वचनी ।
मानवनी भाग्या मानी ।
शिंद्यांचा नौकर शूर । राजाराम वीर । प्रतिज्ञा घोर ।
घेतली देह संस्कारी ॥ ५ ॥
ती घडे प्रतिज्ञा पूर्ण । भाउजी तूर्ण । दिल्लीवर ताण ।

आघाडी यशस्वी मात ॥
सर करुनि दिल्लीचें तख्त । लाल किल्यांत । बहू मानांत ।
फडकली मराठी शान ॥
फडकवीच भगवा झेंडा । राजाराम खंदा । इमानी बंदा ।
सर्वांनीं राखूनि मान ॥
अवमान जसा शिंद्यांचा ।
तैसाच सर्व हिंदूचा ।
सूड । सूड ! ऐशी वाचा ।
जरि घटे कष्ट भाकरी । सेवकी तरी । जिद्दिची खरी ।
घडविली राजारामांनीं ॥ ६ ॥
त्या भव्य दिल्लि नगरींत । लाल किल्ल्यांत । दिवाणू-ई-आमांत ।
दरबार भरविला खास ॥
विश्वासराव सिंहासनी । मान सर्वांनीं । तसा भाऊंनीं ।
अधिकार वंदना त्यास ॥
मग कथन भाऊसाहेबांचें । रक्त थेंबाचें । दत्त शिंद्यांचें ।
घेतील मराठे खास ॥
दरबारीं राजाराम बोले ।
शिर कुतुबखानचें तुटलें ।
माळेंत घालुनी वहिलें ।

वैभवी राजारामाचे । । थोर मानाचे । चीज जगण्याचें ।
जन्मांचें सार्थक खास ॥ ७ ॥
जिंकली रणक्षेत्रांत । प्रथम हप्त्यांत । घोर युद्धांत ।
कुंजपूर रणभूमींत ॥
भाऊस राजारामान । वंदना करुन । करोनि कथन ।
कोंडले कुतूब्र अन् खान ॥
पातला नजीबखान् तेथ । करावे मुक्त । तहा करुं पोक्त ।
गायकुवाड उत्तरा देत ॥
तह करू ना च हरकत ।
शिर छेदू यांचें त्वरित ।
खुनि दत्ताजीचे फस्त ।
स्वाक्षरी तहावर खास । शीर भाल्यास । रक्त टांकास ।
चमकेल तहाचें पान ॥ ८ ॥
सामोर भाऊच्या करून । दया याचन । राखणें प्राण ।
ओलीस तहासी छान ॥
मध्यस्त जाट, कटारो । होळकर भारी । रोहिले कारी ।
प्राणदान द्यावे शरण ॥
सूडास सूड बक्षीस । नीच राक्षस । ना मानवताही त्यास ।
स्मृति दत्ताजीची जाण ॥

ना दया सूड हा बाणा ।
छेदून काढ गर्दानां ।
मग वदे सदाशिव शहाणा ।
भाउनी केला पूकार । राजाराम वीर । उडवितो शीर ।
धन्य ! धन्य ! राजाराम ॥ ९ ॥
परि कहर होय फितुरिचा । नजीबखानाचा । गळा कापीचा ।
पानपती संग्रामांत ॥
अब्दालीस पाचारिला । जाट रोहिला । होळकर रुसला ।
पेशवा बद्ध धर्मांत ॥
रक्षक देह विश्वास । फितुर यवनास । नुमज कोणास ।
उडविलाच विश्वासांत ॥
भाऊजी राजकारणी । पराक्रम रणीं । डवचला फणी ।
सांपडे चक्रव्यूहांत ॥
तै लक्ष बांगडी फुटली ।
थैमान आग पाखडली ।
पानिपतीं हानी झाली ।
तैशाहि प्रसंगी धीर । राजाराम वीर । गारदी शूर ।
चमकलें मित्र सैन्यांत ॥ १० ॥
॥ हर, हर महादेव ॥

## श्रीशिव भ्रमण

आधि नमन शारदा चरणा । शारदा चरणा । शारहा चरणा ।
शारदा चरणा ॥
वनजात शाहिर कवनाला शाहिर कवनाला । शाहिर कवनाला ।
देवांनों ! या गाण्याला ॥
कुलदैवत आधिं नमुनी ।
श्रीदत्ता नमन करूनी ।
अम्बेच्या चरणीं पाणी ॥
हा मर्दाचा पोवाडा । [ शिवाजी बंडा ] । [ बहिर्जी पुंडा ] ।
मर्दानों ! या ऐकण्या ॥
आशीरवच द्या ऐकाण्या । [श्रोतृ-वृंदाण्या] । [शौर्यगुणगाण्या] ।
पोवाडा सुरती गाण्या ॥ १ ॥
तो काळ पातशाहीचा । [मुलुख बाजिचा] । [अशाश्वत साचा] ।
मोंगली राजसत्तेचा ॥
झुंजता पन्हाळा किल्ला । [ दिल्लीचा गिल्ला ] [ मोंगली हल्ला ] ।
कब्जा करि लालमहाला ॥
जिंकूनि पुण्याची भूमि । [योजना नामि ] । [ धुमाळी गनिमी ] ।
पाखडी भाग भवताला ॥
सख्य करी आदिल्शाही ।

हातावर देऊनि लाही ।
गस्त फोडि जसवंतसिंही ।
तो लालमहाली (शिरला) [हल्ला]।[चोर वाटेला]। [छपत जो गेला]।
सिंहाचा छावा जैसा ॥
वार करूनि खानावरति । [महाली राति] [वेध समजूती]।
निसटला जसा बिजलीसा ॥ २ ॥
सिद्दीचा जौहार (केला) [भला]। [शरण जो गेला]। [तहाच्या बोला]।
तोंडासी पानें पुसुनी ॥
घबराट शाएस्तेखाना । [तशी अबलांना]। [मार सर्वांना]।
हाताचीं बोटें तुटुनी ॥
जसवंत (ठेवुनी मागें) [तूर्त मदतीस]। [हुकुम त्या खास]।
[रक्षमुलुखास]। बाद गडी जाई पळुनी ॥
रायगडी वीरा माता ।
कोंकणीं शिवाजी निघता ।
खलबत करि हेरा हाता ।
सुरतेचि (आणुनि वार्ता) [खबर मिळविणें]। [मुलुख हेरणें]।
[बहिर्जी गमणें]। [हेरास धाडिलें पुढता) [पुढें धाडुनी] ॥३॥
(प्रथम रचना)
तो हेर बहिर्जी । नामावंत शिवबाचा ।

सोंगाड्या मालुम जाणकार भाषांचा ॥
औषधी बाळगी आपुल्याच बटव्यांत ।
पंचाग जोतिषा वर्तवि पाहुनि हात ॥
माई तुज मुलगा । होईल आषाढांत ।
फकिरापरि वर्तुनि बात काढि निमिषांत ॥
घेऊनि गांठ एकान्तीं ।
समजून घेतली पुरती ।
कोणासहि दाद न देती ।
मिळवुनी फौजही । शिवबा सांगति त्यांना ।
दौडाया हुकमी । ना कोणा ठिकाणा ॥ ( ४ )
तो हेर बहिर्जी [ सच्चा ] । [ असें शिवबाचा ] । [ हेर नामाचा ] ।
सोंगाड्या मालुम जाणकार भाषांचा ॥
[ कधि गमें फकीरापरी ] । [ जानवे उरी ] [ दर्भ हतियारी ] ।
[ औषधींत वैदू साचा ] ॥
[ पाहातो हात माइचा ] । खेळ नशिबाचा । बाड फाशांचा ।
निमिषांत गुप्त फोडीचा ॥
घेऊनि गांठ एकान्तीं ॥
समजूत घेतली पुरती ।
कोणासही दाद न देती ।
[ साहित्य सर्व जमवोनि । फौज जमवोनि । दौड अभिमानी ।
हुकुमी त्या दाद न दिलसा ] ॥ ४ ॥

( निवटाया दशमुख मोहा । पंचवटी पावन भूच्या ।
जे पादस्पर्शें पावन । वनवासी श्रीरामाच्या ॥ )
क्षेत्रासी पावन करण्या । देवालयि श्रीरामाच्या ) ॥
[ निवटाया दशमुख बुरा । जानकी चोरा । भिकारी तोरा ।
पंचवटी पावन भूच्या ॥
जे पादस्पर्शें पावन । जोड सज्जन । असें जें रान ।
वनवासी श्रीरामाच्या ॥
क्षेत्रासि पावनी करी । राम श्रीहरी । त्र्यंबकेश्वरीं ।
देवालयि श्रीरामाच्या ॥
पातले शिवाजी राजे ।
नमुनि त्या मूर्तिच्या तेजें ।
चैतन्या मिळवी तेजें ।
( प्रथम रचना )
( संहार कराया शिवबा । आळविती श्रीरामातें ॥
नांदवा सौख्य शांतीतें । यापरी नमन रामातें ) ।
[ संतांचें रक्षण करा । पाप धिःकारा । असा होकारा ] ।
आळविती श्रीरामातें ॥
धरतीस भार हा झडा । पापाचा तडा ।
बंड हे मोडा । यापरी नमन रामातें ] ॥ ५ ॥

( चाल बदलून )

एकाग्र भक्तीनें नमन करोनि शिवबा । संतोष घडविला मनि त्या
श्रीरामाच्या ॥
गुंफिला या परी भक्तीचा हा गोफ । तंतूंत मिसळले धागे
तन्मयतेच्या ॥
एकरूप झाले तन्मयतेंत शिवाच्या । रामही मिनाले चैतन्यांत
शिवाच्या ॥
आकाशवाणिही झाली ।
साधूंची पालनवाली ।
दुष्कृत्यें निर्दाळीली ।
अवतार असे शिवबाचा । श्रीरामरूप ऐसा साचा ॥ ६ ॥

हें नमन कशाचें मजला । हें नमन तुझ्या हृदयाला ।
अवतार मीहि विष्णूचा । तैसाच तूंहि विष्णूचा ॥
भेटलो या परी येथें । आशीर्वच तुजला साचा ॥
तूं नाहीं याचा कर्ता ॥
विष्णूसम नाहीं पर्ता ।
तव मनिं सर्व वैष्णवता ।
चैतन्य सर्व कोंदटलें । चैतन्या चिन्ह निमालें ॥ ७ ॥

( प्रथम रचना )

तो काल धुमश्चक्रिचा । कसलाच पिकावा दाणा ॥
आश्वावरि आरूढ शिवबा । खातात चणा फुटाणा ॥
दौडतात हय फुरफुरती । खावूनि गोडवा दाणा ॥
टाप्, टाप् भडकती भूमि । गुल्दस्त गोष्टिना कथना ॥
तो काल धुमश्चक्रीचा । मुलुख बाजिचा । कहर गुंण्डांचा ।
कसलाच पिकावा दाणा ॥
आश्वावरि आरूढ शिवबा । भ्रमण ज्योतिबा । हिंदुचा बाबा ।
खातात चणा फुटाणा ॥
दौडतात हय फुरफुरति । काल धावती । वायुसम कांति ।
खावूनि गोडवा दाणा ॥
टाप टाप्, भडकती भूमि । चकाकि लोमि । आयाळी बामी ।
गुल्दस्त गोष्टिना कथना ॥
भरविण्या तुझी ती ओटी ।
शांतता नांदण्या धरती ।
ऐश्वर्यें हय निघताती ।
( प्रथम रचना )
( त्र्यंबकेश्वरीं मुक्कामा । पातले शिवाजी राजे ॥
अभिषिक्त जरी ते नव्हते । अनभिषिक्त होती राजे ) ॥
[ मुकाम त्र्यंबकेश्वरीं । कीर्तनी हरी । वाद्य रणभेरी ।

पातले शिवाजी राजे ॥
अभिषिक्त जरी ते नव्हते । राज्यही नव्हते । राजदंडातें ।
अनभिषिक्त होती राजे ] ॥ ८ ॥

( चाल बदलून )

त्र्यंबकेश्वरीं शंकर पूजुनि । नमुनि पार्वतीला ॥
शिवबा राजे दौडत निघती । जाण्या सुरतेला ॥
( कौल घेऊनि निघती दौडत । )
कोण ?. कोठले ? कोठे जाता ? गस्तींची पृच्छा ॥
लग्नाचें हें वऱ्हाड मोठे निघते हे कच्छा ॥
पोटार्थी ते गस्तीवाले । आच न कामांत ॥
बसले होते खुशाल धुंदींत । हुक्का फुंकीत ॥
कहाँ चले ए सेना इतना । पठाण गस्तीवान पुसे ॥
चल रहा है औरंगाबादके [ दिल्लीपतीको मिलनेसे ॥
घोडदौड ती उधळत होती । नजीक सुरती जाण्याला ॥
पृथ्वीचा ती गुलाल उधळित । फेकित ती आकाशाला ॥
सुरतेची: सू रत ती होती । सू रत हिवरा सालीला ॥
मदनानें ती मदांध होवुनि । असे सुषुप्ति जनतेला ॥
अशा प्रसंगी धूळ उधळली । आकाशीं संचरतांना ॥
श्रीमंतांचे सेवक जागे । जाग देती मदिराक्षीना ॥

आले, आले वीर मराठे । हर हर गर्जत वेशीशी ॥
पटांगणि परि स्थिरावले ते । नृत्य कराया सुरतेशी ॥ ९ ॥

## सुरतेची लूट

चाल – पोवाडा

जय तुळजापुरची अम्ब भवानी माया ।
राहुनी भूषवी प्रतापगडची काया ॥
परि समशेरिमधि वास्तव्या शिवराया ।
समशेर नमन हे अम्बा-नमन सहाया ॥
हिंदु-धर्म रक्षण करण्या ।
मायाच फिरे खेळाण्या ।
समजावे कैसें अजण्या ।
तामसी वृत्तिची कत्तल करण्या तूर्ण ।
खांडोळ्या उडवी शतधा ती करि चूर्ण ॥ १ ॥

( चाल बदलून )

तुळजापुरच्या अम्बेचरणीं । चित्त शिवाजीचें ॥
सुभेदार सुरतेच्या चित्रण । रंगमहालाचें ॥
इष्काच्या लहरींत पहुडल्या । रंगेली ललना ॥
ख्याली खुशाली विना सुचेना । लंकेर अलपांना ॥
अलमगिराची बलाढय सत्ता । सुरतेकू डर ना ॥

दिल्लिपतीका सेनासागर । गुमान कोणा ना ॥
दारूच्या धुंदीत निशाचर । सुभेदार सुरती ॥
वार्ता आली शिवबाकडुनी । खाना दूते ती ॥
पत्र वाचुनी धुंदि उतरली । परि डर ना त्याला ॥
बंडखोर शिवबाचें भय ना । इनायत्‌खानाला ॥
दिल्लीपतिका मान रखाने । वाल्ला मेरा काम ॥
खंडणी तो दूर रहे । जीव बचाये आम्‌ ॥

× × × × ×

सूरत लुटण्या हुकूम देतो । शिवबा सैन्याला ॥
हेर बहिर्जी पुढें दावितो । इमले लुटण्याला ॥
कहर उसळला कापाकापी । लूट जमा करिती ॥
बाला, अबला शरणांगत त्या । अभये वांचविती ॥ २ ॥

चाल – पोवाडा

जवतरले शम्भो साक्षात्‌ । करण्याला तांडव नृत्या ॥
देखोनि अग्निच्या ज्वाला । कित्येका घडती हत्या ॥
सत्तेला देऊनि टोला । नमविती जयानें सत्या ॥

घबराट इनायत्‌ खाना ।
कत्तल तो देखें नयना ।
लक्ष्मी तो शिवके चलना ।

तो डेरे दाखल शिवबा । सैन्य हुकुम तत्पर देना ॥ ३ ॥
चिंतातुर झाला खान । आंग्रेज बनायें लीन ॥
पोर्तुगीज डच बेपारी । शरणागत तुकवी मान ॥
देऊनि खंडणी शिवबा । सुरतेचा वांचवि प्राण ॥
सोन्यांच्या राशी पडल्या ।
रत्नांच्या राशी पडल्या ।
शस्त्रांच्या राशी पडल्या ।
दरबार नियोजित केला । राजाचा राखुनि मान ॥ ४ ॥
शिवबाको खबर मिलाया । सारंगलोचना आया ॥
आनेका मत्लब बोलो । आपको मिलाने आया ॥
गीतनृत्य करनेवाली । खूंपसुरत ढंगी काया ॥
मेणापर बैठी आये ।
मुहँसे पान् रंगाये ।
सिंहकटी लट्कारीये ।
हुशियार नग्न समशेरी । आनेको फर्मायीये ॥ ५ ॥
आप् कौन् ? कहाँसे आया ? आनेका मत्लब् बोलो ॥
मैने है अवधी थोडा । नही बातचीत करनेवाले ॥
गीतनृत्य करनेवाली । नहि है ए रंगमहालो ॥
ह्यालीत बैसतो खान ।
मी गातो रणमैदान ।

समशेर तत्परी गान ।
संकटो कहाँनो बोलो । खुलनाई करनेवालो ॥ ६ ॥
जी हुजूर या जो समया । आदर्श जाननेवाली ॥
मैं दरबारी हूँ दासी । आमंत्रण देनेवाली ॥
दरबार शराब् लेनेका । इस् हाथसे देनेवाली ॥
आप्‌को तश्रीफ् से लायी ।
विनती कर आदब आयी ।
खान्‌के मर्जीसे आयी ।
खण्डणी बहोत् मिल्नेका । समय तो पातला राना ॥ ७ ॥
आप्‌को इशारत् देना । पेलेमें जहरही मिलना ॥
मेरे बात् सुनो श्रीराया । वो शराब नहि नही पीना ॥
आप्‌का खून करनेका । रंगेल तमाशा इतना ॥
खानोने डाव रचाया ।
दिल्लीपति खूशी होया ।
इनाम बढा मीलाया ।
गीत, नृत्य करनेवाली । दिल् पसंत हुकुमो देना ॥ ८ ॥
शिवराजे पुसती तिजला । खानाचो प्रियकर दासी ॥
यावनी संस्कृती तेरा । ऐसे क्यँव्र कहनेवाली ॥
मैं शराब् कबि नहि लेना । रक्तपात सूरती करना ॥
हरबार नहि नहि होना । मेरेकू धंदा नाना ॥

२० ७९४
२२६०
२१८२
५१८५

रायगडी मेरा माता ।
मेरेपर मोठी ममता ।
मिलनेसे आतूर होता ।
सेनेकू हुकुम् दिया है । फिर जल्दी जल्दी जाना ॥ ९ ॥
खानूको सुनाये तत्पर । माफी ! नही मदिरा लेना ॥
आपही मना कर सकते । मै समशेरी को नमना ॥
गीत नृत्य करनेवाली । दिलपसंत हुकुमी देना ॥
मै नही यवनी कन्या ।
कुलशील मराठी कन्या ।
रांया तुज करिते नमना ।
उध्वस्त मराठे घेती । यावनीं क्रूर बलिदाना ॥ १० ॥
त्या नरक यातना मोठया । ही गुलाम वृत्ती भोगी ॥
ठेविलें अनंते जैसे । नशिबांत वर्तते जागी ॥
सत्य हे सत्य हे राया । नशिबांत वर्ततें जागी ॥
उपकार करावे राजा ।
देवावतारि हे राजा ! ।
न्यावेस येथुनि काजा ?
वाहण्या शीर स्वाराज्या । तत्परा असे मी योगी ॥ ११ ॥
( चाल बदलून )
गहिवरले ऐकुनि कहानी । दीन अनाथांची ॥

शिवबा राजे सुन्न जाहले । शर्थ ऐकण्याची ॥
हुकूम दिधला सेनानायक ! । न्यायी हे कन्या ॥
पुण्याई लाधली भली ही । गुणवन्ती धन्या ॥
न्यावे इजला तुळसा नामें । ही माझी कन्या ॥
पुण्याई लाधली भली ही । गुणवन्ती धन्या ॥ १२ ॥

चाल – पोवाडा

तुळसाच अशी ही तुळसा । बाल धीरासा । ओळखी फांसा ।
संभाजी प्रेम पिपासा ॥
सागराऽव्हान देणारि । नव्हे भीणारी । कार्य करणारी ॥
दर्यासह झुंजविणारी ॥
पति दर्यासागर नाथ । परी ही धुंद । निश्चयी फंद ।
स्वातंत्र्य जिला हा छंद ॥
कहरास यावनी सत्ता ।
देवूनि झुलविली मत्ता ।
स्वातंत्र्य मराठे सत्ता ।
ही लूट असे सुरतेचि । लूट शिवबाचि । हांक दीनाची ।
वात्सल्ययुक्त प्रेमाची ॥ १३ ॥

( चाल बदलून )

लूट घेऊनी वीर परतले । जाण्या रायगडी ॥

हरहर माहादेव ! गर्जुनी । शोभुनि सैन्यगडी ॥
प्रसन्न चित्ती ममतेनें ही । पाहुनिया लूट ॥
वीरा कन्या स्वयें आणिली । दख्खनूची लूट ॥ १४ ॥
हर, हर महदेव बोला ॥
भगवा झेंडा फडकत आला । हरहर महादेव बोला ॥

## दिल्लीचें सार्थक झालें ! !

आधि नमन शारदा चरणा । शारदा चरणा । शारदा चरणा ।
शारदा चरणा ॥
वनजात शाहिर कवनाला । शाहिर कवनाला । शाहिर कवनाला ।
देवांनों या गाण्याला ॥
स्वातंत्र्य राष्ट्रवीराचा । अहिंसावादी लोकउपकारी ।
मानवहो या ऐकण्याला ॥ १ ॥
गणराज्य वैभवा चढलें । नेत्र दीपले । राष्ट्र उद्धरलें ।
दिल्लीचें सार्थक झालें ॥ रे ॥
स्वातंत्र्य आंग्लभूमीचें । वीर वृत्तिचें । थोर मानाचें ॥
हिंदांच्या चित्तीं रुजले ॥ रे ॥
झटकण्या गुलामी झूल । पुढारी मूळ । मान बंगाला ॥
कॉंग्रेस सभेला आले ॥ रे ॥

बोनर्जी पटकावितो । सिंह गरजतो । झेंडा वंदी तो ॥
अध्यक्ष पदीं ते बसले ॥ रे ॥
नंतर ते दादाभाई ।
मोतिलाल नेहरू भाई ।
अनिबिझांट आजीबाई ।
अठराशें चौऱ्यांशिला । पारतंत्र्याला । लाथ देण्माला ।
त्या मुहूर्त मेढी रमले ॥ २ ॥
नमन त्या दासबाबुला । बिपिन् चंद्राला । लाला रायाला ।
राजेंद्रसिंह बाबूला ॥
सर हेन्‌री, माल्वीयाला । राशबिहारिला । पटेल बंधूला ।
सर चंदावरकराला ॥
सत्येंद्रसिंह, सयानिला । हाकिम्‌खानाला । अल्ली बंधूला ।
चक्रवर्ति राजाजीला ॥
वेड‌र्बर्न, अयंगाराला ।
अनूसारि, विशन् धाराला ।
अंबिकाचरण, चार्लूला ।
नमन त्या सर्व प्रमुखाला । चंदनी केला । देह झिजविला ।
अध्यक्ष पदीं भूषला ॥ ३ ॥
जो तिलक हिंद भूमिचा । स्वराज्या साचा । फुटविली वाचा ॥

घोषणा कराया सुटला ॥
स्वातंत्र्य हक्क हिंदांचा । जन्म सिद्धांचा । असे जनतेचा ।
जनतेला घोषित केला ॥
नमन त्या बाळ टिळकाला । टोला देण्याला । राज्यसत्तेला ।
कारागृहवासी झाला ॥
आंग्लासी सुटला कंप ।
गर्जना करी थरकांप ।
सावरकर ओढी चांप ।
अन्तर्गत स्वातंत्र्याचा । प्रथम हप्त्याचा । मोर्ले-मिंटोचा ।
हिंदास बहाली केला ॥ ४ ॥
दलितांची सेवा करुनी । आफ्रिकेमधुनि । व्रता पत्करूनी ।
परतोनि गांधिजी आले ।
जे मीठ गोरगरिबांचें । जीव जगण्याचें । परी मोलाचें ।
ओझ्यांत कराच्या रुतलें ॥
झेलली उडी देशांनि । दांडि गांठूनि । रुढी मोडोनी ।
सत्याग्रही दांडी गेलें ॥
असहकार ग्वाही दिधली ।
आंग्लांची सत्ता नुरली ।
स्वातंत्र्य लाट आदळली ।

थरकांप इंग्रजा सुटला । सुचेना त्याला । बंधनी घाला ।
महात्मा बंधन केलें ॥ ५ ॥
रौलट् बिल जारी करुनी । बंधना करूनि । त्रस्त करवोनि ।
हिंदवी पुढारी नेले ॥
जालियानवाला बागीं । जना कोंडोनि । बाल अबलांना ।
तोफेच्या तोंडी दिधले ॥
ती सूर कण्ठ कोकिला । सरोज, इंदिरा ! आदि अबलांना ।
कारागृहवासी केले ॥
तरु फुटे तोंड आंग्लानीं !
भडकला अग्नि तेलांनीं ।
उसळला लोट जोरानीं ।
आंग्लास तिरस्कारुनी । जनार्दन जनी । पेट संतापी ।
कायदेभंग ज्वालांनीं ॥ ६ ॥
भडकला महायुद्धाचा । कहार जगताचा । प्रळय हिट्लरचा ।
चर्चील गर्ज जयघोषा ।
कॉंग्रेस त्रिपुरीला जादि । अहिंसावादी । महात्मा गांधी ।
अध्यक्षपदीं नेताजी ॥
तत्वांत भेद हे तंत्र । नको परतंत्र । घडो स्वातंत्र्य ।
बाहेर पडे नेताजी ॥

स्वातंत्र्य सैन्य जमवोनी ।
जयहिंद निशाणा नमुनी ।
स्वातंत्र्य हिंद प्रकटोनी ।
आंग्लांच्या हाती लाहि । फिरविली ग्वाही । हिटलरी शाही ।
गांठला जर्मनी राजी ( गाजी ) ॥ ७ ॥
परत जा आंग्ल देशाला । महात्मा वदला । आंग्ल सत्तेला ।
जाणार क्रिप्स बद फर्जी ॥
नेताजी जपान देशाला । झेंडा बंदिला । तिरंगीवाला ।
रणवीर लक्षुमी गर्जी ॥
आंग्लांच्या हिंद सैन्याला । लढा ना दिला । परी मिळविला ।
रणगीतें वाजत गर्जी ॥
नौकादल वणवा कीर ।
टरकले इंग्रजी वीर ।
चर्चील करी विचार ।
गर्जल्या क्षेत्र दुंदुभी । तशा रणभेरि । मार्च हिंदांचा ॥
स्वातंत्र्य हिंद सैन्यांचा ॥ ८ ॥
धन्य धन्य मौंट्बॅटन । मानाचें पान । मान–धन शील ।
अधिकारी प्रमुख आंग्लांचा ॥
प्रमुखत्व लोक राज्याला । मौंटबॅटन्‌ला । मान देशाला ।

राखिला मान आंग्लांचा ॥
गांधीजी बडा जादुगार । जाणि उपकार । आंग्ल नय थोर ।
प्रमुखत्व प्रथम हिंदांचा ॥
उतरले युनियन् जॅक ।
फडकले तिरंगी चाक ।
झेंड्यांत उंच जें नाक ।
तरबेज, नीतिचे थोर । जगावरि मोर । राज धुरंदर ।
हितगूज कर्मचारांचा ॥ ९ ॥
एकोणीशें सत्तेचाळिस । पंधरा ऑगष्ट । हिंद हो तुष्ट ।
स्वातंत्र्य डौल मानाचा ॥
गांधीजी राज्यवाहक । जवाहर चोख । जसा चाबूक ।
पोलाद पटेल हाताचा ॥
घडवितो राज्यनीतीला । लोकराज्याला । समाज रचनेला ।
हो मित्र प्रमुख राष्ट्रांचा ॥
विश्वांत भावना प्रेम ।
दाविला प्रकटुनि नेम ।
भावना निधर्मी राम ।
गणराज्य वैभवा चढलें । नेत्र दीपले । राष्ट्र उद्धरिलें ।
दिल्लीचें सार्थक झालें ॥ १० ॥
॥ जय हिंद ॥

# नाट्य – छटा

## – नो जुरिस्डिकशन !!!

माझा अर्ज आहे ............ आज पुरावा सुरुं करणारच. अर्ज काय आहे ? .......... आपणांला हा दावा चालविण्याचा अधिकार नाहीं. जुरिस्डिक्शनचा मुद्दा आहे. .......... म्हणता ऽऽऽ काय ? मला अधिकार नाहीं ?? अन् त्याकरतां अर्ज !! आणा इकडे. म्हणें मला अधिकार नाहीं. अहोऽ? मला अधिकार नसतां तर मी येथें कसा बसलो असतो ? अन् माझा अधिकार काय आहे हे मला जास्त समजणार कीं तुम्हांला ? वकिलांनीं कांहीं तरी अर्ज करून पुरावा पुढें ढकलावयाचा ? फी राहिली असेल दुसरे काय ? तुम्हाला आतांच दाखवितो कीं मला अधिकार आहे कीं नाहीं. अर्ज डिसमिस. पुकारा वादी ......... तसं नव्हे सऽऽर. सिव्हिल प्रेसिजर कोड कलमाप्रमाणें हा दावा आपणाला चालवितां येणार नाहीं ......... चला ! वादी पुकार अन् घाला पिंजऱ्यांत. ......... मला यावर अपील करावयाचें आहे. ......... ठीक ? द्या तसा अर्ज ........ मंजूर ........ द्या पुढील तारीख. प्रश्न अधिकाराचा आहे. .......... ( नंतर कांहीं दिवसांनीं ) हांऽऽऽ अपील कोर्टही म्हणते कीं या कोर्टाला अधिकार नाहीं. ठीक. फाईलवरचा एक दावा निकाली निघाला.

# पक्षकार ऐकतच नाहीं

पुकारा ? ×× वकिलांना .......×× वकीऽऽऽऽऽल ? या, हा अर्ज काय आहे ? तुम्ही तर वादीचें देणें कबूल केलें आहे. कसला अर्ज ? मी वाचला अन् तुम्हाला पुकारलं. कमालच करतां तुम्ही ??? अर्जांत लिहितां कीं कैफीयतींतील तक्रारी कायम ठेऊन हुकुमनामा करावा. ??? सिव्हिल प्रोसीजरच्या कोणत्या कलमा खालीं हा अर्ज ? ............... अर्ज आहे. त्याला कलम कशाला पाहिजे ? .......... हे कसें शक्य आहे ? दावा व कैफीयत यांतील वादग्रस्त मुद्यावर निकाल द्यावा लागतो. खरं ना !! ......... मेहेरबान कोर्टाकडे अर्ज दिला आहे. पासष्ट पैशांचें कोर्ट फी स्टँप लावलेलें आहे. सही केलेली आहे. आतां हुकुम करणें कोर्टाचें काम आहे. मर्जीनुरुप हुकुम व्हावा. ........ पण यांत हुकुम कसा करणार ? .............. तो प्रश्न मे. कोर्टाचें कक्षेंतला आहे. ................ अहो ××× ? यांना समजावून सांगा. अर्ज म्हणाल तर परत करतो नाहींतर नामंजुर करतो. पण असा अर्ज करणें हे कायद्याचें अज्ञान आहे. ...... ....... ×××× वकिलांनीं सांगायला मला काय समजत नाहीं ? पण पक्षकाराची तशी इच्छा आहे. तो ऐकतच नाहीं. त्यावर त्याचीही सही आहे. ......... असंऽ होय ? बरं ! तर मग — अर्ज नामंजूर !

# ज्ञानकोशविक्री

आज पगाराची ओरड आहे. त्यांचें खरें आहे. मी तरी काय करणार ? पैसा तर नाहीं. सकाळी आठ वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत ज्ञानकोश विक्रीकरतां घराचे उंबरठे झिजवतो. दिवसभर फिरले म्हणजे एकादा – दुसरा देतो झालं – दहा रुपये पहिला हप्ता. पुनः कितीही पत्रें टाका. हप्ते येतच नाहींत. लोकांना पैसे खर्च करून पुस्तकें घेणेंची आवड कमी. सावकारांचाही तगादा. हं चला, देशपांडे – गोंडवनांतील प्रियंवदा कादंबरी चालू आहे. या .......... ... पण असं करांना डॉक्टर साहेब ! जगांतील वाचनालयाची यादी मागवूं अन् त्यांचेकडे जाहिराती पाठवू. .............. अहो ! कोण विचारतो आपल्या भुक्कड एन्सायक्लोपीडीयाला ! जगांत ब्रिटानिका, अमेरिकन, फ्रेंच, जर्मन असें पुष्कळ एन्सायक्लोपीडीया पडलेले आहेत. आपला ज्ञानकोश घेतो कोण ? ............. ठीक, पण छापखाना आपला आहे. फक्त पोस्टेज खर्च होईल. गाजराची पुंगी वाजली .... काय ? गाजराची पुंगी – ती तर कधीच वाजणार नाहीं. पण मागवा यादी, अन् करा सुरवात. ‘ अकरणात् मंदकरणं श्रेयात् ! ’ काय ! ! तीऽऽन महिने झाले. एकही

ऑर्डर नाहीं. All quite on western front ! विचारतो कोण ? आज २४०० चा जर्मनीचा चेक आला. अरे ! आज तर ६००, १८००, ३०० असे तीन चेक आले. काय हो देशपांडे चेकचा पाऊसच पडूं लागला. ही केवळ आपली कर्तबगारी. खरंच ते. ज्ञानकोश सर्व खपला. आतां प्रत शिल्लक नाहीं.

## हुरडा पार्टी

राजाभाऊ ! आज तुम्ही हुरडा पार्टीला आमचेकडे या, बरं कां ! ! तुम्ही अजून आलाच नाहींत आमच्या शेताला. आज त्या ठिकाणीं चहा करणार आहोत. चहा तर काय—दरवर्षी होतोच म्हणा पण आजच्या चहाची स्पेशॅलिटी औरच !!!— म्हणजे SSS विजापूर भागांतला के. टी. कां ?— छे ! होSSS ! करतां काय त्या के. टीला चहा घेतला म्हणजे तुम्ही असे म्हणाल कीं असला चहा जन्मांत घेतला नाहीं. – हांSSS ! – काय म्हण-तांय काय ? इतका नामांकित चहा आहे तरी कसला !!!—तें तुम्हाला आल्याशिवाय कळणारच नाहीं. साहेब वगैरे चुकती मंडळी येणार आहेत. डॉक्टरनीही येण्याचे कबूल केले आहे. त्यांचे गाडींतच या म्हणजे झाले. हुरडा नाहीं खाल्ला तरी चालेल. पण चहाचा एक घोट घेतला कीं तुम्ही बेहद्द खूष व्हाल.— तसे असेल तर मी माझे गाडीनें येतो.— वाः ! मग तर अती

उत्तम ।! त्या गाडींतही कांहीं मंडळी येतील. — जरूर.

× × × × ×

आळांत ! या ! प्रथम तुम्हाला माझी जमीन दाखवणार आहे. आमच्यांतील शेती तज्ज्ञ तुम्हीच !— जरूर ! जरूर ! कां नाहीं पाहणार. चला ! ही पहा– ही ताल. असं कांहीं विलक्षण डोकं चालवलं कीं कांहीं विचारूं नका. उन्हाळ्यांत या टेकडीवर शेळ्या मेंढ्या चरतात. पाऊस पडला कीं ते सर्व खत आपोआप वाहून येतं. तालींत आडवलं जातं. अन् मग काय ! असलंऽऽऽ कणीस !! अन् ती विहीर ! या विहिरीचं पाणी अति उत्तम ! गोड! म्हणजे कमालीच गोड ! मी मात्र अजून या विहिरीचं पाणी प्यालो नाहीं. मालक पडलो ना ! पूजेला वापरतो व आचमनापुरतें घेतो. तेवढेच. जमीन तर फार उत्तम !-- तुम्हाला चांगलं धन मिळालं !!! वाऽ ! फारच छान !— हे तर खरंच. अहोऽऽऽ ! बाराशें रुपयाला घेतली, अन् आतां दहा हजाराला मागतात. पण मी देणार नाहीं.-- मग खरं सांगू कां ? पैसा पदरांत पाडून घ्या व कॅनॉलखालीं भरपूर पाणी असलेल्या विहिरीची मी तुम्हाला जमीन घेऊन देतो.-- ते खरं, पण माझं या जमिनींत मन रमलं. पाणी ! अन् ही ताल !! बरं पण, हुरडा तयार आहे.

× × × × ×

# पक्षकार ऐकतच नाहीं

पुकारा ? ×× वकिलांना .......×× वकीऽऽऽऽऽऽल ? या, हा अर्ज काय आहे ? तुम्ही तर वादीचें देणें कबूल केलें आहे. कसला अर्ज ? मी वाचला अन् तुम्हाला पुकारलं. कमालच करतां तुम्ही ??? अर्जांत लिहितां कीं कैफीयतींतील तक्रारी कायम ठेऊन हुकुमनामा करावा. ??? सिव्हिल प्रोसीजरच्या कोणत्या कलमा खालीं हा अर्ज ? ............... अर्ज आहे. त्याला कलम कशाला पाहिजे ? .......... हे कसें शक्य आहे ? दावा व कैफीयत यांतील वादग्रस्त मुद्यावर निकाल द्यावा लागतो. खरं ना !! ......... मेहेरबान कोर्टाकडे अर्ज दिला आहे. पासष्ट पैशांचें कोर्ट फी स्टॅंप लावलेलें आहे. सही केलेली आहे. आतां हुकुम करणें कोर्टाचें काम आहे. मर्जीनुरुप हुकुम व्हावा. ........ पण यांत हुकुम कसा करणार ? ............. तो प्रश्न मे. कोर्टाचें कक्षेंतला आहे. ............... अहो ××× ? यांना समजावून सांगा. अर्ज म्हणाल तर परत करतो नाहींतर नामंजुर करतो. पण असा अर्ज करणें हे कायद्याचें अज्ञान आहे. ...... ....... ×××× वकिलांनीं सांगायला मला काय समजत नाहीं ? पण पक्षकाराची तशी इच्छा आहे. तो ऐकतच नाहीं. त्यावर त्याचीही सही आहे. .......... असंऽ होय ? बरं ! तर मग – अर्ज नामंजूर !

# ज्ञानकोशविक्री

आज पगाराची ओरड आहे. त्यांचें खरें आहे. मी तरी काय करणार ? पैसा तर नाहीं. सकाळी आठ वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत ज्ञानकोश विक्रीकरतां घराचे उंबरठे झिजवतो. दिवसभर फिरलें म्हणजे एकादा – दुसरा देतो झालं – दहा रुपये पहिला हप्ता. पुनः कितीही पत्रें टाका. हप्ते येतच नाहींत. लोकांना पैसे खर्च करून पुस्तकें घेणेंची आवड कमी. सावकारांचाही तगादा. हं चला, देशपांडे – गोंडवनांतील प्रियंवदा कादंबरी चालूं आहे. या ............... पण असं करा ना डॉक्टर साहेब ! जगांतील वाचनालयाची यादी मागवूं अन् त्यांचेकडे जाहिराती पाठवू. .............. अहो ! कोण विचारतो आपल्या भुक्कड एन्सायक्लोपीडीयाला ! जगांत ब्रिटानिका, अमेरिकन, फ्रेंच, जर्मन असें पुष्कळ एन्सायक्लोपीडीया पडलेले आहेत. आपला ज्ञानकोश घेतो कोण ? ............ ठीक, पण छापखाना आपला आहे. फक्त पोस्टेज खर्च होईल. गाजराची पुंगी वाजली .... काय ? गाजराची पुंगी – ती तर कधीच वाजणार नाहीं. पण मागवा यादी, अन् करा सुरवात. ‘ अकरणात् मंदकरणं श्रेयात् ! ’ काय ! ! तीऽऽन महिने झाले. एकही

ऑर्डर नाहीं. All quite on western front ! विचारतो कोण ? आज २४०० चा जर्मनीचा चेक आला. अरे ! आज तर ६००, १८००, ३०० असे तीन चेक आले. काय हो देशपांडे चेकचा पाऊसच पडूं लागला. ही केवळ आपली कर्तबगारी. खरंच ते. ज्ञानकोश सर्व खपला. आतां प्रत शिल्लक नाहीं.

## हुरडा पार्टी

राजाभाऊ ! आज तुम्ही हुरडा पार्टीला आमचेकडे या, बरं कां ! ! तुम्ही अजून आलाच नाहींत आमच्या शेताला. आज त्या ठिकाणीं चहा करणार आहोत. चहा तर काय–दरवर्षी होतोच म्हणा पण आजच्या चहाची स्पेशॅलिटी औरच !!!– म्हणजे SSS विजापूर भागांतला के. टी. कां ?— छे ! होSSS ! करतां काय त्या के. टीला चहा घेतला म्हणजे तुम्ही असे म्हणाल कीं असला चहा जन्मांत घेतला नाहीं. – हांSSS ! – काय म्हणतांय काय ? इतका नामांकित चहा आहे तरी कसला !!!— तें तुम्हाला आल्याशिवाय कळणारच नाहीं. साहेब वगैरे चुकती मंडळी येणार आहेत. डॉक्टरनीही येण्याचे कबूल केले आहे. त्यांचे गाडींतच या म्हणजे झाले. हुरडा नाहीं खाल्ला तरी चालेल. पण चहाचा एक घोट घेतला कीं तुम्ही बेहद्द खूष व्हाल.— तसे असेल तर मी माझे गाडीनें येतो.— वाः ! मग तर अती

उत्तम !! त्या गाडींतही कांहीं मंडळी येतील. — जरूर.

× × × × ×

आलांत ! या ! प्रथम तुम्हाला माझी जमीन दाखवणार आहे. आमच्यांतील शेती तज्ज्ञ तुम्हीच !— जरूर ! जरूर ! कां नाहीं पाहणार. चला ! ही पहा- ही ताल. असं कांहीं विलक्षण डोकं चालवलं कीं कांहीं विचारूं नका. उन्हाळ्यांत या टेकडीवर शेळ्या मेंढया चरतात. पाऊस पडला कीं ते सर्व खत आपोआप वाहून येतं. तालींत आडवलं जातं. अन् मग काय ! असलंऽऽऽ कणीस !! अन् ती विहीर ! या विहिरीचं पाणी अति उत्तम ! गोड! म्हणजे कमालीच गोड ! मी मात्र अजून या विहिरीचं पाणी प्यालो नाहीं. मालक पडलो ना ! पूजेला वापरतो व आचमनापुरतें घेतो. तेवढेच. जमीन तर फार उत्तम !-- तुम्हाला चांगलं धन मिळालं !!! वाऽ ! फारच छान !-- हे तर खरंच. अहोऽऽऽ ! बाराशें रुपयाला घेतली, अन् आतां दहा हजाराला मागतात. पण मी देणार नाहीं.-- मग खरं सांगू कां ? पैसा पदरांत पाडून घ्या व कॅनॉलखालीं भरपूर पाणी असलेल्या विहिरीची मी तुम्हाला जमीन घेऊन देतो.-- ते खरं, पण माझं या जमिनींत मन रमलं. पाणी ! अन् ही ताल !! बरं पण, हुरडा तयार आहे.

× × × × ×

अरे ? असला हुरडा कशाला काढलांत. हे बारीक कणीस.-- मग आपल्यातला हा असलाच आहे म्हणून काढला-- जरा थांबा ! असं कराऽ त्याऽऽ तात्याचे शेतांतला उत्तम गुळभेंढी हुरडा आणा. अरेऽऽऽ तात्यान् मी काय दोन आहोत ?-- अहो राहुद्या हो. हाही हुरडा चांगलाच आहे.-- मानसं सोन्यासारखी जमलीतं म्हणन तळमळ. बाकी तुम्ही तसं म्हणता तर ठीक आहे. हा घ्या, अति कोवळा. ओठांनीं चावावा. बरं साहेबांना ही चटणी जरा जास्त घाला बरं कां ? हिला राजाराणी चटणी म्हणतात. खावून तर पहा. अति उत्तम. त्या चटणीचं नांवच ते.-- काय म्हणता !! राजाराणीऽऽऽ !!! मग मलाही पाहिजे.--काय मामा ? नांवांत गोडी आहे म्हणून मागता काय ?-- छे ! हो ! लज्जतच चांगली. दही पण स्पेशल आहे. थोडं आणा.—थोडंऽऽऽ काय ?हवं तितकं घ्या. चहाही तयार झालाच. साहेबांना आणखी एक कप घाल. अहो ! दोन कप झाले आतां बस् !........बस् कसा ? घाल, घाल, तेवढा कप जास्त नाहीं. चहाच तसा आहे.-- चहा आणलाच आहे. मलाही एक कप आणखी घाल.--तुम्हाला मिळणाऽऽऽर नाहीं. चहाच तसा बरं ? घाल त्यांना लागेल इतका !!! काय हो डॉक्टर तुमचा अभिप्राय काय ?........मला तर हा गुलकंद मिश्रित काढाच वाटतो ( सर्व जणांत हंशा )— बरं असूं द्या. पण चव कशी काय डॉक्टर ?— अति उत्तम !!!

# भांडण कोर्टांत

पाटीऽऽऽल ! गाड्या तयार हैती ! आतां निघालं तर रात्र विसावा घेऊन दिवस उजाडण्याला कोर्टात ! पुराव्याची तारीख आहे. केशवराव पाटलाच्या चार गाड्या पुढं वाटचाल करूं लागल्या आहेत. त्या पाहूनच आम्ही सहा गाड्या तयार केल्या. वतनाचा दावा ! प्रत्येक कामांत आघाडी पाहिजे ना ! काव म्हणतांऽ काय ? गोविंदराव ? बाकी तुम्ही आमचे बाजूला असल्यावर आम्हाला कशाचीच काळजी नाहीं. पावणेतीन वर्षं हेलपाटे घालतोय्. तेव्हां आतां कुठं दावा पुराव्यावर आला-- हो ! दोन्ही बाजूचे वकील आपलेच भांडण समजून निकरावर येतात. मी तर तवा ' आ ऽऽ ' वासून पहातो भांडणच तसं ! गांवचं मालक माधवराव कां केशवराव हे ठरायचय् ना !-- आली कां बारामती ? केशवरावचा तळ त्या झाडाखालीं उतरलाय्--आतां आली पंचाईत --माऽऽरे भाकरीवर ताव मारत्यात्—या माधवराव या . बरें वेळेवर आलात्. भाकरी खा. अहो--भांडण कोर्टात. म्हणून काय् कोर्टाच्या बाहेर आपण वैरी थोडेंच आहोत. तुम्ही दावा जिंकला काय्, आन् मी जिंकला काय्! दोघांनांही एकाच गांवांत रहावयाचे आहे.—ठीक, ठीक --गोविंदराव, गाड्या सोडा आपण सर्वजण मिळूनच भाकरी खावू ! कोर्टांत

वकील भांडतील आपल्याला काय्. जेवढे विचारतील तेवढें सांगायचं. निकाल कसाही होवो. पण वैर नसावं. हे पहा, केशवराव! मी होतो तुमच्यावर रागांत.--पण तुम्ही आपुलकी दाखविली. बस्! आतां राग गेला. कोर्टांतलं वेगळं. मला चांगलं आठवतय् शेजारच्या पाटलाचं भांडण- जमिनीचा वाद- चांगला बारा वर्षं चालला. पण पाटलांनीं आपल्या शत्रूचा कधी उपमर्द केला नाहीं. चहा-पाणी, आदर सर्व राखला. मी त्यांना एकदां सहज म्हणालो— असलं कसलं हो भांडण. तवा त्यो पाटील काय म्हणाला!-- खरं सांगू आम्ही दोघेही बालपणापासून मित्र. पण गांवांतले लोक नाकांत काड्या घालतात. त्याकरतां हे करणं भाग पडतं, नाहींतर तसं पाहिलं तर जमिनीवर माझा कोणताच हक्क नव्हता. चालायचचं.

## लग्न कर्तव्य नाहीं !

या ? कृष्णाजीपंत या !- नमस्कार- कसंही झालं तरी इनामदार लोक ...... गेले ते दिवस ...... जावू द्या, पण आपण आहोत ना! ...... एवढंच खरं ...... पाव्हण्यांचा परिचय ? .... आपणाला जें स्थळ सुचवलं त्या चिरंजीवांचे हे वडील ...... ठीक, ठीक, नमस्ते.... नमस्ते ...चिरंजीव XX

×× ठिकाणी प्रांत आहेत. तिकडे निघालो. सहज जातां जातां इनामदार साहेबाकडे उतरलो. म्हटलं, भेटून जावं. ...... यामुळं तरी आपले पाय आमचे गरिबाचे घराला लागले, बरं झालं ! !! ...... तुम्ही SSS अन् गरीब ! मग गरीबीची व्याख्याच बदलावी लागेल ...... बरं, ते असो ...... पत्रिका जमते आहे. मुलांनीं मुलगी पसंत केली तर कार्यभाग होईल ...... चिरंजीव सांगलीला प्रांत हापिसर आहेत. डायरेक्ट रिक्रूट ! ...... हं. मग चांगली गोष्ट आहे. ...... पण अडचण तर मोठी आहे !!! ...... चिरंजीवांनीं वडिलांना सांगितलं कीं दोन तीन वर्षें तरी लग्न कर्तव्य नाहीं. तेव्हां वडिलांचा नाइलाज आहे. ...... आतां आपण आलां अन् मुलाला दोन गोष्टी समजावून सांगितल्या तर मान पडेल असें वाटते. ...... छे ! त्यांत अर्थ नाहीं. ऐन् पंचविशींत ज्याला लग्न करावेंसें वाटत नाहीं त्याला माझी मुलगी देणेची इच्छाच नाहीं. आम्ही आपलं असं स्थळ पाहणार कीं जो मुलगा लग्न करण्यास तयार आहे. अहो ! पूर्वींचे दिवस गेले. आतां गव्हर्नरला कोणी विचारीत नाहीं. कुठला प्रांत ऑफीसर अन् कसलं काय ? लग्नाचे बाजाराची तेजीमंदी निराळ्या स्वरूपांत आहे. तुम्ही तरी मनाला वाईट वाटून घेऊं नका. मुलगा तुम्हाला अजून शिव्या देत नाहीं हे भाग्य समजा ! बरं – या ! नमस्कार.

# लग्नांतील तेजी मंदी

तिकडं मुलाला स्थळाबद्दल विचारणा होत आहे हे समजलें. पण विचार करा ! जगांत महायुद्धाचा वणवा पेटला आहे. बॉंब हल्यानें गांवेच्या गांवें बेचिराख होत आहेत. उद्यां काय होईल याचा भरंवसा नाहीं. अन् तुम्ही लग्नाबद्दल लिहिता कसे ? हेंच समजत नाहीं. ...... समजलो ...... रंगनाथ ! हे दादांचें पत्र. आतां तुझा तूंच मालक आहेस ...... खरं आहे. ( दोन वर्षांनंतर ) हे पहा काका ! दादांना वाटंऽ कीं तिकडली मुलगी पसंत करावी. पण मी इकडे. त्यामुळें तिकडे सासूस. ...... अन् इकडं आम्हाला लग्न कर्तव्य नाहीं म्हणून आतां मुली सांगून येत नाहींत. युद्ध थांबून दोन वर्षें झालीं. आतां इकडं नाहीं अन् तिकडं नाहीं. हे होणार कसं !!! ××× च्या अरगडे मास्तरची कशी जिरली तशीच गत आमची होणार !! ..... हा अरगडे कोण ? अन् त्याची काय जिरली !! ..... त्याचं असं झालं ! कीं त्याचा मुलगा झाला B. A. अन् त्याला स्वर्ग उरला दोन बोटं !!! दोन हजार हुंडा देणारांनींच मुली दाखवाव्यांत असा तो घमेंडखोर बोलूं लागला. समाजस्थिति व आपला जगांतील प्लॅटफॉर्म तो विसरलाच. मुली सांगून यायच्या व हा हुंड्यांनीं नवरी मागें सारायचा. झाले ! कोणी मुली सांगून येईनात.

वयाच्या पस्तीस वर्षेपर्यंत मुलगा ब्रह्मचारी !! मग मुली द्या म्हणून पाया पडून कसं तरी लग्न झालं एकदाचं ! यांत कांहीं अर्थ नाहीं. ...... बरंऽऽ, मुली येतील. आपण पाहूं. त्या XXXX मुलगी पाहिली. पसंत आहे कां ? ...... काय् म्हणतोस ? पसंत नाहीं. ठीक. ...... आतां ही दुसरी मुलगी पहा. ...... ही मुलगी पसंत आहे. ...... ठीक, मग त्यांना कळवितो. दामू, ये दामू ! मुलीच्या बापाला निरोप दे कीं मुलगी पसंत आहे. काय म्हणतोस ? ते निघूनही गेले ? व्हय् साब, त्यांनीं निरोप ठेवलाय् कीं मुलीस मुलगा पसंत नाहीं. प्रश्नच मिटला. ठीक, बरं पुनः मुलगी येईल ती पाहूं. ....... काका ! तें कांहीं नाहीं. पहिलींच पसंत करा व उरकवून टाका. लग्नाच्या बाजारांत मागणी आहे तोंवरच माल खपला पाहिजे. बाजार शिळा झाला म्हणजे चव गेलीच समजा.

## अर्धवट ज्ञान

साहेब !! बरेंच दिवस पाहतोय, तुम्ही दवा खाताय् – आतां मी तुमाला एक मुळी खायला देतो. – तूं खूप देशील, पण ! पण मला काय होतंय्, याची तुला कांहीं तरी कल्पना आहे कां ? — नाहीं. —— अन् मग तूं मुळी कशावर देणार !!! देतोच मुळी, खाऊन तर पहा ! ...... अन् बरं वाईट झालं तर !

...... छा, छा, मी तुमच्याकडं १५।१६ वर्षं कामावर ! तसं मी वाईट कसं करीन ! ! ...... झालाऽऽ तर उपाय, अपाय नाहींऽऽच. ( मुळी जावून आणतो ). मी अदुगर खावून दावतो. मग तर हरकत नाय् ! तसं कांहीं नाहीं, आण इकडे मी खातो. ( दोन वेळां दोन दिवस मुळी खाण्यानंतर ) लईऽऽ गुणकारी मुळी. आज नऊ वर्षं आबद्तोय. पायांतल्या चमका, गुढग्यांतलं दुखणं, पाठातल्या वेदना, पोटांतला वात ...... सर्व कांहीं कमी आलं. ...... अन मला तुमी रोज पाय रगडायला सांगत होता म्हणून तर मुळी दिली ! मुळी घ्यावीऽऽ कां न घ्यावी...... घ्याऽऽ कीं, त्यानं कायबी होणार नाय् ! किती झालं तरी वनसी. ...... सहा दिवस झाले. ...... नाकांतून उष्ण वाफा येत आहेत. ... येतीऽऽल ! ... अरे डोक्यांत सुन्न झालंय्.- होईऽल एकादी धमनी तुटली तर ' राम ' म्हणण्याची पाळी ...... अग ए ! मला थोडं दूध दे पाहू ........ अरेच्या ! उष्णता कमी आली ........ आंऽऽ, पुनः वाढली. आतां काय ? ........ खातो तूप, साखर, पेढे, दूध आन ताक – झोप तर आवरेनाशी झाली. दिवसा झोप – रात्री झोप .... कोण आलय्........ मी बाबूराव. आला तसेच परत जा. मला बोलवत नाहीं. ........ झालं तरी काय् ? हातानें इशारा करून – जा – झोप, झोप, झोप, रोग पळाला. ... किती दिवस झाले ग ? एकवीस दिवस

झाले. आतां बरयू बरं कां. झोप कमी झाली बरें वाटतें — त्या अडाण्याकडे काय दोष ? अर्धवट ज्ञान ! समाधि घेतल्यानंतर ती उतरविण्याचे ज्ञान पाहिजे. नाहींतर ब्रह्मानंदी लागली टाळी । अन् — " कोण देहातें सांभाळी । " दैवाची खैर झाली. थोडी जास्त मुळी खाण्यांत आली असती तर मग झोपच झोप ! ! ! पण दैवाची खैर व झोपेंतून उलगडलो. कां ग ? मधी एक दिवस डॉक्टर कां बोलावला ? अनू मला चहा कॉफीवर का ठेवलं ? काय़् ? डॉक्टरनीं सांगितलं ! ठीक. अडाणी वैद्य, अन् शहाणा डॉक्तर ! ! तुला आतां सांगतो — मी रोज विठूकडून पेढे आणून खात होतो तेव्हां बरं वाटलं. पोटांतली आग चहा कॉफीनें जास्त पेटत होती.

## प्रश्नपत्रिका

उद्यांचे पेपरमधील दोन प्रश्न दत्त्या गुप्त्याला माहित पडले असें तो सांगतो .... मग ! प्रश्न कोणते ?... ते तर तो सांगत नाहीं. त्याला भाव चढलाय् ... दत्त्याऽऽऽ ! अन् मी गेल्यावर मात्र सांगितल्याशिवाय राहणार नाहीं. आतां वाजले रात्रीचे आठ. उशीर नको. ... काय़् रे दत्त्या ! तुला एकट्याला पास व्हायचय़् नाय़् कां ? बरं ऽऽऽ साल्या तूंच हो एकटाच पास. कां सांगतोस कोणते प्रश्न तें ?.... अरं ऽऽऽ ! न सांगायला झालय़् काय़् ? बरं

माझ्या नांवाची बोंब उगीचच होईल म्हणून मी दचलो. आतां एवढं कर. तुला कुणी विचारलं तर दे फडणिसाचं नांव सांगून. .... वाऽऽरे बहाद्दर ! प्रश्न तर बहारीचे आहेत, गुरुया! लेका ! उगीच जगांत टिमकी कशाला ? घरीं जावून झोप कसा !! तीस मार्क कायम झाले, ... दत्त्या ऽऽऽ ! तुझे प्रश्न आलेच नाहींत. .... आरंऽऽऽ ! त्याचं असं झालं. या दोन प्रश्नाचा झाला गवगवा फार. तवा रातोरात प्रश्न बदलून येरवड्याहून नवा पेपर छापून आणला — असें गोखले बुकडेपोमधील दुकान झाडणाऱ्या वसंतानें सांगितलें. — कुठला वसंता न् कुठलं काय ! निव्वळ थापा ! .... बाबारे ! मी खरंच सागतोय़ पेंडशाचे घरीं गाडी आली. मी गेलो आन् परत आलो. असं वसंताच म्हणाला. पहिले प्रश्न तरी त्यानेंच सांगितले. पण या मोटारींत बंदोबस्त होता..... बरंऽऽ जावू दे. नाहीं प्रश्न समजले म्हणून काय झालं ! अरे ऽऽ मला पाठक म्हणतात. या पेपरांत ऐंशी टक्के मार्क मिळाले तरच मला पास म्हणा. नाय़तर, सांगून सवरून खालच्या वर्गांत राहीन. अरेऽऽ! अशा चोऱ्या करून कां कुठं फायदा होतो ! Dishonesty wins not more than honesty. रिझल्टच पहा. .... मोठा आलाय़् नाकाला मोती लावून. मग कशाला धडपडलास रात्री दत्त्याच्या घरीं ? अरे केवळ तुझ्याकरतां. ' जगाच्या कल्याणा संताच्या विभूति। देह कष्टविती उपकारें॥ बरंऽऽ! तुझा

पेपर कसा काय ? .... मला कांहीं खात्री नाहीं. चंद्रीच्या नादांत अभ्यासाला वेळच मिळाला नाहीं. म्हणून तर प्रश्न पत्रिकेच्या मागें लागलो. ' इदं च नास्ति परंच न लभ्यते । '

## नो व्हेकन्सी !!!

शास्त्रीबुवा ! अहोSS शास्त्रीबुवाSS !! इकडं या .... काय रावसाहेब ! .... अहो काय म्हणून काय विचारतां !! आज आहे बंडूचा रिझल्ट. पास झाला SS की ब्रँडरचे हाताला धरून त्याला कलेक्टरच करतो. .... तात्याबा ! वर्तमानपत्र आणलय् काय ? .... रिझल्ट पहाता ! .... बंडू पा SS स. पेढे आणवा. ( बंड्या पहातो ) .... अरे ! क्लास कोणता ? .... पास क्लास. -- ठीक! आपल्याला पास होण्याची गरज. नापास अन् पास .... बस्स् -- नापास नाहींना ? म्हणजे पास क्लासची जरूरच नाहीं. आतां अर्ज कर. ब्रँडरला माझे नांवाचं पत्र लिही. तुला माहीत नाहीं. प्रांत असतांना आपले घरीं पानसुपारीला आला म्हणजे तो व त्याची मडबीण मांडे आवडीनें खात बसत. वायां जाणार नाहीं. तो आहे मुंबईस अबकारी खात्याचा मुख्य. .... काय म्हणतोस ? पत्राचें उत्तर आलेयू ? .... काय म्हणतो ब्रँडर ? त्यानं पुण्याच्या कलेक्टरला पत्र लिहीलय्, अन् तिकडं अर्ज करा -- म्हणतो. .... ठीक-- बरं SSS ! पुण्याचा कलेक्टरचें काय उत्तर आलें ?

.... नांव एन्लिस्ट केलें आहे. बस्स्, झालं काम ! अरे ! सुतानं स्वर्ग चढावा लागतो. तूं आतां L. L. B. च्या टर्म्स् भर. बसूं नकोस. अन् अर्ज करीत रहा. माझंही लक्ष्य आहेच. .... तीन महिने झाले. सर्व ऑफीसांत नांव एन्लिस्ट झालें. व्हेकन्सी कुठेंच नाहीं. ! आतां समक्षच अर्ज घेऊन जातो रजिस्ट्रारकडे अन् मागतो सब्-रजिस्ट्रारची जागा. .... हं SS ! या. काय् आणलय् ? अर्ज ! ठीक, यस् तुमचं नांव एन्लिस्ट केलं आहे. ............ Sir ! my request is for appointment. पण कां हो ! इतकी सर्व ऑफीसें सोडून याच ऑफीसांत अर्ज कां केलांत ! खरं सांगा, तुम्हाला या जागेचं इंगित माहीत असलं तर तुम्हाला नेमणूक मिळणार नाहीं. — बरं -- इंगित माहीत नसलं तर तुमचं जनरल नॉलेज कमी म्हणून घेतां येणार नाहीं. You can go now. नुसत्या अर्जावरून कां कुठं नौकऱ्या मिळतात ? ....... काय् ? कुठंच व्हेकन्सी नाहीं ? जाव् द्या ! झालं. वशिल्याशिवाय काम नाहीं.

२०६१४
२२६०
REFBK-0020714

# अर्पण – पत्रिका

## कै. अक्रूर यादव केसकर



## यांना आदरपूर्वक अर्पण

आजि अक्रूर हा । जातो निजधामाला ।
विष्णुलोक स्वीकृत केला ॥

जन्म ता. १९।७।१८९६ मृत्यू १।९।१९७४

निरतिशय सुखानें चित्त आल्हाद पावें ।
समरस ऐक्यातें चित्त – संधान व्हावें ॥ १ ॥
गुणमय तव प्रीति रुंजली माझिया जी ।
चिरसुख मम जीवीं स्थैर्य होवूनि राजी ॥ २ ॥

अरे काका ! पक्षी, जरि असति तूं, दूत स्वर्गेश्वराचा ।
स्वयें आत्मा नेत्रीं, गृहण करिशी, हा वर तुला ॥
जरी पीडा देहीं, क्षुधित परि ना स्पर्श करणें ।
मृताच्या पिंडाला, जरि मृत असे, वांछित मनें ॥ १ ॥

परी अक्रूराचा क्षणहि तुजला, धीर न गमे ।
मुखीं तूं पिंडातें, धरूनि क्षणही, भक्ष नलगे ॥
तसा तो संतात्मा, पटविशि जगा, निश्चित भ्रमें ।
जया त्रिगू लोकीं चरण कमळीं, आश्रय गमे ॥ २ ॥